दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •


• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ११८ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# पर्यटक, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी लोणावळा-कार्ल्यात पर्यटक पोलिस ठाणे

## अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)–पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील लोणावळा व वडगाव (कान्हे) उपजिल्हा रुग्णालयांची कामे गतीने पूर्ण करावी. मौजे जांभूळ येथील क्रीडा संकूल सर्व सुविधायुक्त, मावळ तालुक्याचा गौरव वाढवणारे असावे, देहू नगरपंचायतीसह, खडकाळे, वराळे, डोणे आढळे, डोंगरगाव कुसगाव, पाटण, कार्ला व परिसरातील पाणीपुरवठा योजना गतीने पूर्ण कराव्यात. मौजे कार्ला येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासह श्री एकवीरा मंदिर परिसराच्या विकासाची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.लोणावळ्यातील पर्यटकांची आणि कार्ला येथील भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन दोन्ही ठिकाणी सुरक्षेच्यादृष्टीने पर्यटन पोलिस ठाणी स्थापन करण्यात येतील. महामार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तळेगाव, चाकण, शिक्रापूर परिसरातल्या महामार्गाचे रुंदीकरण, महामार्गावर उड्डाणपूल उभारण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल, यासाठी मी स्वत: पुढाकार घेईन, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बैठकीत स्पष्ट केले.**



पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करुन या प्रकल्पांना गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर (व्हीसीद्वारे), स्थानिक आमदार सुनील शेळके यांच्यासह नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, वित्त व नियोजन, पाणीपुरवठा- स्वच्छता, आरोग्य, एमएसआरडीसी, एमएसआयडीसी, गृह, क्रीडा आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पुण्याचे जिल्हाधिकारी, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय तसेच पुणे ग्रामीण पोलीसचे वरिष्ठ अधिकारी (व्हीसीद्वारे) उपस्थित होते.बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, कार्ला येथील आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात. मंदिर परिसरात भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी मंदिर परिसराच्या विकासाची कामे करण्यात येत आहेत. वेहेरगाव येथील श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर रोपवे उभारण्यासंदर्भातील कामांना मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पामुळे भाविकांना अल्पावधीत मंदिरात पोहोचता येणार आहे.

### पाणीपुरवठा योजनांच्या कामांना गती द्यावी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातंर्गत मंजूर डोणे आढळे, वाढीव डोंगरगाव कुसगाव, पाटण व ८ गावे, कार्ला व ७ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, खडकाळे, वराळे, देहू नगरपंचायत पाणीयोजनांच्या कामांच्या सद्यस्थितीचाही आढावा घेतला. या सर्व पाणीयोजनांच्या कामांना गती द्यावी, असे निर्देश दिले.**

प्रकल्पाची गतीने उभारणी करावी, अशा सूचना दिल्या.लोणावळा व वडगाव (कान्हे) उपजिल्हा रूग्णालयाचे सुरुवातीच्या टप्प्यांचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे. उर्वरित कामांचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तालुका क्रीडासंकुल बांधण्यासाठी मावळ तालुक्यातील मौजे जांभुळ येथे २ हेक्टर ६० आर क्षेत्र मंजूर करण्यात आले आहे. यात कबड्डी, खो खो, व्हॉलीबॉल, फूटबॉल, टेनिस, धावपट्टी, प्रेक्षागार आदी सोयी सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. ही कामे मंजूर निधीतून तातडीने सुरु करावीत, ज्या कामांना अतिरिक्त निधी लागेल तो तातडीने उपलब्ध केला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

# स्वारगेट प्रकरणातील आरोपीची खैर नाही नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे

## अशी सरकारची भूमिका-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करण्याची गय केली जाणार नाही. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. त्यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पुण्याच्या स्वारगेट बसस्थानक परिसरात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाला होता. या घटनेमुळे एकच खळबळ माजली होती. अत्याचार करून फरार झालेला आरोपी स्थानकातील सीसीटीव्हीत कैद झाला. दत्तात्रय रामदास गाडे असे त्याचे नाव असून त्याच्या शोधासाठी पोलिसांची १३ पथके रवाना झाली असून तपास केला जात आहे.पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. आमच्या लाडक्यासोबत निंदनीय प्रकार घडलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी स्वत: या प्रकरणात लक्ष घालून आहे. मी स्वत: पुणे पोलिसा आयुक्तांशी चर्चा केली आहे. याप्रकरणी कठोर कारवाई करण्याच्या सूचना आम्ही सरकारच्या वतीने दिलेल्या आहेत. आरोपीचे सर्व लागेबांधे पोलिसांच्या हाती आलेले आहेत. त्याला कुठल्याही परिस्थिती तत्काळ अटक केली होईल.अशाप्रकारचे नराधम आमच्या लाडक्या बहिणींवर अत्याचार करत असतील, तर त्यांची गय केली जाणार नाही, सोडले जाणार नाही. अशा नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, यासाठी पूर्णपणे प्रयत्न करण्याचे सरकारचे धोरण आणि भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आरोपी हा कुठल्याही पक्षाचा असू द्या, त्याचा कोणाशीही संबंध असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. हा गुन्हेगार आहे. लाडक्या बहिणीवर अत्याचार करणाऱ्या



गुन्हेगाराला सोडले जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. ज्या बस आगारात बंद पडलेल्या बसमध्ये होणारे गैरप्रकार पूर्णपणे बंद झाले पाहिजेत. अशा प्रकारच्या बंद पडलेल्या गाड्या तत्काळ निकाली काढाव्यात. कुठल्याही परिस्थितीत गुन्हेगारीला वाव मिळता कामा नये, अशा सूचना सर्व आगार प्रमुखांना दिल्या आहेत. परिवहन मंत्र्यांनी काल सुरक्षा रक्षकांवर निलंबनाची कारवाई केलेली आहे. या प्रकरणात कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही. एसटी महामंडळ प्रशासन आणि सरकारच्या वतीने कठोर कारवाई केली जाईल. लाडक्या बहिणी सुरक्षित राहिल्या पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे.

# नागपूरचे पोलिस आयुक्त पुण्यात फक्त हप्ते वसुलीसाठी पाठवले का?:विजय वडेट्टीवार

**नागपूर (वृत्तसंस्था)**–पुण्यात एसटी स्थानकात झालेल्या बलात्काराची जबाबदारी राज्य सरकारची आहे. महाविकास आघाडी सरकारने शक्ती कायदा आणला होता, पण या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. बलात्कार होऊन देखील अजूनही आरोपी पकडला जात नाही, यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंदवडे निघाले आहेत, अशी टीका काँग्रेस नेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे.



दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, पुण्याचे पोलिस कमिशनर आधी नागपूरमध्ये होते. पुण्यात गेल्यावर गुन्हेगारांची परेड केली, पुढे काय झाले? आता पुण्यात जाऊन हफ्ते वसूली करण्यात व्यस्त आहेत का? पोलिसांचा धाक उरलेला नाही, त्यामुळे महिला अत्याचाराच्या घटना वाढ.विजय वडेट्टीवार म्हणाले की, गुन्हा घडून गेल्यावर सरकार जागे होते. राज्यात कोलमडलेली कायदा आणि सुव्यवस्था याबाबत येणाऱ्या अधिवेशनात आम्ही प्रश्न उपस्थित करू. एसटी स्थानकात अत्याचार झाल्यावर परिवहन मंत्री आता बैठक बोलवत आहे, याचा उपयोग नाही.विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणाऱ्यांना सुरक्षा दिली जाते. राहुल सोलापूरकर असेल किंवा कोरहटकर असेल यांच्यावर कारवाई होत नाही. उलट ते आरएसएस संबंधित असल्याने त्यांना अभय दिले जाते.भाजप यांच्या विरोधात निषेध करत नाही, आता तोंड का शिवली गेली,असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.विजय वडेट्टीवार म्हणाले की, आतापर्यंतचा रेकॉर्ड पहिला सत्तेमधील असलेल्या लोकांशी संबंधित असलेल्याच लोक महिलांवर अत्याचार करताना दिसत आहेत. बदलापूर घटनेमध्ये अजूनही ही संस्था चालकावर कारवाई झाली नाही. आरोपीला एककाउंटरमध्ये मारून त्याला अभय देण्याचे काम राज्यामध्ये सुरू आहे. त्यामुळे त्याही आरोपीला जर उद्या अभय मिळाले तर वावगे ठरणार नाही. शैक्षणिक नगरीमध्ये मुली सुरक्षित नाही, तर तिथले पोलिस कमिशनर काय करत आहे? चॉकलेट खाऊन बसले आहे का? ते हप्ते वसुलीसाठी आहे का??

# नाशिकचा पालकमंत्री भाजपचाच सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे वरिष्ठांचा निर्णय

## रायगडचा पालकमंत्री कोण? अद्यापही पेच कायम

**मुंबई (वृत्तसंस्था)**–सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असून रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा अद्याप सुटलेला नसल्याची माहिती भारतीय जनता पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने दिली आहे. त्यामुळे आता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा एकदा गिरीश महाजन यांच्याकडेच देण्यात आले असून रायगडचा तिढा मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एकत्र बसून सोडवण्याचा सल्ला देखील दिल्लीतून देण्यात आला आहे.

राज्यात सत्ता स्थापन झाल्यानंतर देखील अद्याप दोन जिल्ह्याचे पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. या दोन जागेवरून महायुतीमध्ये वाद असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे नाशिक आणि रायगड जिल्ह्याला अजूनही पालकमंत्री मिळालेला नाही. १८ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री पदांच्या नावांची



घोषणा केली होती. मात्र त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाला स्थगिती द्यावी लागली होती. या दोन्ही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून एकनाथ शिंदे यांच्या गटाचे नेते नाराज असल्याची माहिती समोर आली आहे.नाशिक जिल्ह्यात आगामी काळात होणारा सिंहस्थ कुंभमेळा पाहता नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाकडेच राहणार असल्याची माहिती दिल्लीतील सूत्रांनी दिली आहे. कुंभमेळा मंत्री म्हणून या आधीच गिरीश महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळ्याचे भव्य नियोजन करण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. त्यासाठी गिरीश महाजन यांच्याकडेच पालकमंत्री पद राहणार असल्याची माहिती मिळाली आहे. आगामी एक ते दोन दिवसातच याबाबत अधिकृत घोषणा होऊ शकते.नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकचे पालकमंत्री पद हे भाजपकडे राहणार असले तरी रायगडच्या पालकमंत्री पदाबाबतचा तिढा अजूनही कायम आहे. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी बसून एकत्र निर्णय घ्यावा, असे निर्देश दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत. रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भरत गोगावले यांच्या कडे देण्याची एकनाथ शिंदे यांची इच्छा आहे. तर अजित पवार यांना आदिती तटकरे यांच्याकडे पालकमंत्री पद द्यायचे आहे. त्यामुळे आता याबाबत एकनाथ शिंदे आणि अजित पवार काय निर्णय घेतात? हे पहावे लागेल.

## मंत्री शिरसाटांची सिडको बसस्थानकाला अचानक भेट

# कामकाजाचा घेतला आढावा पाहणीनंतर कर्मचाऱ्यांना सुनावले

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकानंतर महत्त्वाचे असलेल्या सिडको बसस्थानकाला जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज अचानक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी बसस्थानक परिसरातील परिस्थितीची पाहणी करून आढावा घेतला. या पाहणीदरम्यान संजय शिरसाट चांगलेच संतापल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी सिडको बसस्थानक कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पुणे शहरातील वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बसस्थानक परिसरात २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची घटना घडली होती. विशेष म्हणजे सुरक्षा रक्षकाच्या कॅबिनजवळ ही घटना घडल्याने एकच खळबळ उडाली होती. या घटनेनंतर पुण्यामध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शहरातील सिडको बसस्थानकाला गुरुवारी



सकाळी अचानक भेट देऊन पाहणी केली.संजय शिरसाट यांनी सिडको बसस्थानकात अचानक भेट दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. पुण्यातील घटनेनंतर सिडको बसस्थानकातील कामकाजाचा तसेच सुरक्षेचा आढावा घेतला. यावेळी बसस्थानक परिसरातील असलेल्या अस्वच्छतेवरून देखील संजय शिरसाट यांनी कर्मचाऱ्यांना सुनावले. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही तरी सुरू आहेत का? असा प्रश्न संजय शिरसाट यांनी उपस्थित केला आहे. याबाबत पोलिस आयुक्तांशी बोलणार असल्याचे ते म्हणाले. दुसरीकडे, पुणे स्टेशन एसटी बस स्थानकाची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पाहणी करण्यात आली. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे आणि पदाधिकाऱ्यांनी आगार कर्मचाऱ्यांशी चर्चा करून बसस्थानकातील सुविधांचा आढावा घेतला. यावेळी ठाकरे गटाकडून विविध मागण्यांचे निवेदन आगारप्रमुखांना देण्यात आले.दरम्यान, स्वारगेट बस डेपो परिसरात एसटी बस मध्ये झालेल्या बलात्कार प्रकरणानंतर आता महाराष्ट्र शासनाचा परिवहन विभाग हाय अलर्ट वर आला आहे. या संदर्भात आज झालेल्या बैठकीत सर्व एसटी डेपोंमध्ये सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याच्या सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केल्या आहेत.

## स्वस्त धान्य दुकानात आलेली ज्वारी व गहू जनावरेही खाईना

# ज्वारीला मोठ्या प्रमाणात (धनुर) जाळे लागलेले असून त्यातील ज्वारी काळपट असुन अळ्या वं किड लागल्याने अर्ध्या फुपाटा ज्वारीत

**गंगापुर । प्रतिनिधी**

लासूर स्टेशन सह गंगापूर तालुक्यातील रेशन लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानातुन निकृष्ट दर्जाच्या ज्वारीचे वाटप करण्यात येत असुन जनावरांच्या समोर टाकले असता जनावरे खात नसल्याने लाभार्थ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. तालुक्यासह शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये सध्या अंत्योदय व प्राधान्य लाभार्थ्यांना वाटप होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या ज्वारीचे वाटप होत असल्याने ते तात्काळ बंद करावे व चांगल्या प्रतीचे धान्य वाटप करावे अशी मागणी तालुक्यातील लाभार्थ्यांनी केली आहे. .

गंगापुर ग्रामीण तालुक्यासह शहरामध्ये सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये महाराष्ट्र शासनाकडून पुरवण्यात आलेल्या अंत्योदय व प्राधान्य मधील लाभार्थ्यांना धान्याचे वाटप करण्यात येत आहे. त्यातील ज्वारी हे धान्य अत्यंत निकृष्ट प्रतीचे असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात (धनुर) जाळे लागलेले असून त्यातील ज्वारी ही काळपट असुन किड लागल्याने अर्ध्या फुपाटा झालेला आहे. तसेच सदरील ज्वारीचा मोठय़ा प्रमाणावर उग्र स्वरुपाचा वास येत असतो. त्यामुळे सदरील ज्वारी ही खाण्याचे लायक नसूनसुद्धा ती स्वस्त धान्य दुकानातून वाटप करण्यात येत आहे. सदरील निकृष्ट प्रतीचे धान्य वाटप करून शासन एक प्रकारे जनतेच्या जिवाशी खेळत आहेत. याबाबत संबधित स्वस्त धान्य दुकानदाराकडे विचारपूस व तक्रार केली असता ते सांगता की यात आमचा काहीही दोष नसून आम्हाला तालुका पुरवठा अधिकाऱ्यांकडून धान्य येते असते ते आम्ही वाटप करीत असतो. त्यामुळे यात आम्ही काहीच बदल करू शकत नाही.तालुक्यात वाटप करण्यात आलेले धान्य बुलढाणा येथून आलेले आहे.



या निकृष्ट ज्वारीची माहिती जिल्हाधिकारी यांना माहीती देण्यात येणार असून यावर जिल्हाधीकारी जो काय निर्णय घेतील त्यावर पुढील कार्यवाही करणार–तहसीलदार वगवाड

**स्वस्त धान्य दुकानातून देण्यात येणारी ज्वारी इतकी निकृष्ट आहे की तिला जनावरा पुढे टाकले तरी जनावरही खात नाही तर माणसाने खाल्ली तर माणसाच्या आरोग्य खराब होण्याची दाट शक्यता आहे, शासनाने नागरिकाच्या आरोग्य हलक्यात घेऊ नये व हे धान्य वाटप त्वरित बंद करावे नसता आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल वं लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल...**

**–बाळासाहेब थोरात**
**( नेते,राष्ट्रवादी काँग्रेस,लासूर स्टेशन )**

---

# महाशिवरात्रीची सांगता महा शृंगार व महा आरतीने विशेष महत्व असलेल्या हनुमान मंदिरात

## दररोज शेकडो विद्यार्थी, व्यापारी आणि व्यावसायिक रेल्वेने प्रवास करत मंदिरात दर्शन घेऊन आपला दिनक्रम सुरू करतात

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी १० वाजता पुलगाव हनुमान मंदिरातील शिवालय स्टेशन चौक परिसरात मारोठीया, पूजा मरोठी, रत्नेस दुबे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला , ज्यामध्ये भोलेनाथ महादेवाला भव्य दिव्य हार, वेलीची पाने आणि गुलाबाच्या फुलांनी सजवण्यात आले होते. सायंकाळी पार्वती, गणेश, नंदी, स्वामी कार्तिक आणि नाग देवता यांच्या मूर्तींची सजावट करण्यात आली, त्यानंतर गणेशजी, शिवजी, जगदंबा माता आणि हनुमानजी यांच्या मूर्तींची सजावट करण्यात आली.आरती करण्यात आली आणि



मंदिर पूर्णपणे विद्युत रोषणाईने सजवण्यात आले. पुलगाव रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या हनुमान मंदिराचे अनन्यसाधारण आणि साधे महत्त्व आहे हनुमान जयंती निमित्त, मंदिराची काळजी घेण्यासाठी येथे सर्वात मोठा अन्न प्रसाद भंडारा आयोजित केला जातो. कार्यक्रमात संपूर्ण पुलगाव शहरातील भाविक सर्व प्रकारे योगदान देतात.

---

# महाशिवरात्रि व घोष दिना निमित्त पुलगावात पथसंचलन



**पुलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुलगाव शाखेच्या वतीने घोष दिनानिमित्त तसेच महाशिवरात्रीनिमित्त पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले.


स्थानिय गांधीनगर मधील विवेक शाखा संघस्थानाहून घोष पथसंचलनाला प्रारंभ झाला. प्रारंभी घोष साहित्याचे, वाद्याचे पुजन करण्यात आले.विविध रचनांचे वादन करीत पंचधारा शिवमंदिरामध्ये समारोप करण्यात आला. मार्गामध्ये परिसरातील नागरिकांनी, मंदिरात जाणाऱ्या व येणाऱ्या भक्तांनी पथसंचलनाचे स्वागत केले. मंदिरात थांबून संघ घोषाच्या विविध रचना वाजविण्यात आल्या. संघाच्या या आगळ्या वेगळ्या अभियानाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला.

---

# आज पद्मश्री चैत्राम पवार यांचा सत्कार सोहळा

**जव्हार । प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम, जनजाती विकास मंच आणि केशव सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री पुरस्कार प्राप्त ग्रामविकास पुरुष चैत्रामजी पवार यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता प्रगती प्रतिष्ठान, जव्हार येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मारड हे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून पालघरचे खासदार डॉ. हेमंत सरवा आणि विक्रमगडचे आमदार हरिश्चंद्र भोये उपस्थित राहणार आहेत.धुळे जिल्ह्यातील बारीपाडा गावात राहणारे चैत्राम पवार हे गेल्या ३० वर्षांपासून जल, जमीन, जंगल, जनावर आणि जन या पंचसूत्रीच्या माध्यमातून ग्रामविकासाचे कार्य करत आहेत. त्यांनी आपल्या गावाचा विकास जागतिक स्तरावर आदर्शवत मॉडेल म्हणून उभा करून दाखवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे.या सोहळ्यात आदिवासी समाजात भरीव कार्य करणाऱ्या मान्यवरांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



---

# आर.के.ज्ञान मंदिरम येथे मराठी राज भाषा दिवस मोठ्या उत्साहात साजरा

## कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाचे औचित्य

**पुलगाव । प्रतिनिधी**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते व पद्मभूषण कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणजेच विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून पुलगाव येथील आर.के. ज्ञान मंदिरम इंग्रजी माध्यम शाळेत शाळेचे प्राचार्य श्री. नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व परम प्रिय विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या उपस्थितीत मराठी राजभाषा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे प्राचार्य श्री. नितीन श्रीवास आणि पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर यांच्या हस्ते कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थित कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना



आदरांजली वाहिली. प्राचार्य श्री. नितीन श्रीवास यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर व मराठी शिक्षिका श्रीमती संगीता लोणारे प्रामुख्याने उपस्थित होत्या. मराठी शिक्षिका व पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर ,मराठी शिक्षिका श्रीमती संगीता लोणारे व मराठी शिक्षिका श्रीमती योगिता तिवरे यांचे शाळेचे प्राचार्य श्री निितन श्रीवास यांनी पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना शाळेचे प्राचार्य श्री.नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर व मराठी शिक्षिका श्रीमती संगीता लोणारे यांनी मराठी भाषेची महती व थोरवी आपल्या ओजस्वी वाणीतून व्यक्त केले.

मराठी शिक्षिका श्रीमती योगिता तिवरे यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य श्री. नितीन श्रीवास यांच्या सुरेख मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले. शेवटी या कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्राचे राज्यगीत 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीताने झाली जे समाजशास्त्र शिक्षिका श्रीमती अमृता मोहोरे यांनी सादर केले.

---

# गोधन तस्करीप्रकरणी धर्म रक्षक हिंदू सेना व बजरंग दलाला मोठे यश

## रोहा पोलिसांकडून तस्करीसाठी वापरलेली गाडी पुन्हा जप्त

**रोहा । प्रतिनिधी**

रोहा शहरात गोधन तस्करीचे प्रकार दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. अशातच ३ फेब्रुवारी रोजी बायपास रोडवर गोधनाची अवैध वाहतूक करणारी गाडी धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाच्या सतर्कतेमुळे अडवून आरोपीला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणात सुरुवातीला पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून देखील तस्करीसाठी वापरलेली गाडी सोडून दिली. मात्र धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाच्या पाठपुराव्यामुळे अखेर पोलिसांना तीच गाडी पुन्हा जप्त करावी लागली.

३ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास रोहा बायपास रोडवर एका गाडीमध्ये गोधनाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाला मिळाली. त्यांनी तात्काळ गाडी अडवून ड्रायव्हर जावेद हुसेन वालवटकर याला रोहा पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले. मात्र, गाडीवरील पुढील आणि मागील नंबर प्लेट वेगवेगळी असल्याने संशयास्पद बाब निदर्शनास आली.या प्रकरणी रोहा पोलिसांनी रात्री उशिरा आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र तस्करीसाठी वापरलेली गाडी काही वेळेतच सोडून देण्यात आली. यावर धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाने आक्षेप घेत गाडी पुन्हा जप्त करण्याची मागणी केली.या प्रकरणी उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर यांच्या त्वरित हस्तक्षेपामुळे गाडी पुन्हा जप्त करण्यात आली. त्यामुळे धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाने त्यांचे आभार मानले.

### लाच देण्याचा प्रयत्न फोल ठरला

**गाडी अडवताना गाडी चालक अझरुद्दीन जावेद वालवटकर याने बजरंग दल आणि हिंदू रक्षक कार्यकर्त्यांना पाचशे रुपयांच्या नोटांचे बंडल देण्याचा प्रयत्न केला. मात्र कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता आरोपींना पोलिसांच्या ताब्यात दिले.**

### पोलिसांचा निर्णय बदलला

**धर्म रक्षक हिंदू सेना आणि बजरंग दलाने या प्रकाराबाबत रोहा पोलीस स्टेशनचे उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांच्या आदेशानंतर रोहा पोलिसांनी गाडी पुन्हा जप्त केली.**

---

# विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप यांची सदिच्छा भेट


**सोलापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी करमाळा येथे माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. बायपास रोड येथील निवासस्थानी प्रा. राम शिंदे यांनी भेट घेतली. तुळजापूर येथे नियोजित दौऱ्यावर जात असताना त्यांनी ही भेट दिली.यावेळी दोघांमध्ये चहापानासह मनमोकळ्या गप्पा झाल्या. प्रा. राम शिंदे आणि जयवंतराव जगताप यांचा जुना स्नेह आहे. विधान परिषद सभापतीपदी निवड झाल्यानंतर प्रथमच करमाळा दौऱ्यावर आलेल्या प्रा. राम शिंदे यांचा माजी आमदार जयवंतराव जगताप आणि शंभूराजे जगताप (जगताप गटाचे युवा नेते) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी जगताप गटाच्या वतीने प्रा. राम शिंदे यांच्या कारकीर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



---

# श्री रामेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी



**प्रशांत टेके पाटील । कोपरगाव**

कोपरगाव तालुक्यातील वारी येथील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या श्री रामेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त दर्शन व अभिषेकासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली.साक्षात प्रभू रामचंद्रांनी स्थापन केलेल्या महादेवाच्या पिंडीवर अभिषेक करण्यासाठी पहाटेपासूनच भाविकांची रीघ लागली होती. दिवसभर मंदिर परिसर भक्तांच्या ओसंडून वाहणाऱ्या गर्दीने गजबजून गेला होता.

सायंकाळी ६ वाजता पहिल्या प्रहर पूजेस प्रारंभ झाला. त्यानंतर रात्री ९ वाजता दुसरा प्रहर, १२ वाजता तिसरा तर पहाटे ३ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत चौथा प्रहर अशा चार प्रहरांमध्ये ब्रम्हवृंदांच्या मुखारविंदातून शास्त्रोक्त पद्धतीने विधीवत पूजा पार पडली.दुसऱ्या दिवशी सकाळी काल्याच्या कीर्तनाने या कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करून भाविकांना प्रसाद देण्यात आला. महाशिवरात्री निमित्ताने झालेल्या या भक्तिमय सोहळ्याने संपूर्ण वारी परिसर भक्तिरसात न्हाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# तहसिलदारांच्या आश्वासनानंतर राणा वाघमारे यांचे उपोषण मागे

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील आळसुंदे - वरकुटे शिव रस्त्याचा सोळा वर्षा पुर्वी शेतकऱ्यांच्या बाजुने निकाल होवून सुद्धा दडपशाही, व राजकीय हस्तक्षेपामुळे प्रलंबित असलेला आळसुंदे-वरकुटे शिव रस्ता मोकळा होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. या शिव रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने अनेक वर्षापासून शेतकऱ्यांचि रहदारी बंद होती . ऐन पावसाळ्यात शाळकरी मुलांना आनि नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते . अनेक वेळा तहसीलदार यांना संबंधित रस्ता खुला करून देण्याची मागणी ग्रामस्थांनी आनि शेतकर्यांनि केली. परंतु आजतागायत तो रस्ता खुला होत नसल्याने अळसुंदे येथील युवा शेतकरी राणा वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांनी तहसीलदार शिल्पा ठोकडे यांना भेटून सदर रस्ता खुला करण्याची विनंती केली.यानंतर तहसिलदार यांनी दखल घेऊन संबंधिताना या बाबत सुचना केल्या.

शेतकऱ्यांनी पोलीस बंदोबस्तात हा रस्ता व्हावा यासाठी पोलीस अधीक्षक सोलापूर यांचेकडून परवानगी देखील घेतली. सदर ठिकाणी बंदोबस्तात लवजामा दाखल झाला मात्र २००८ च्या आदेशानुसार सदर ठिकाणी अडथळा नाही असे मंडळ अधिकारी यांनी सांगितले . परंतु शेतकर्यांना जाण्यासाठी रस्ता कुठून आहे हे मला सांगता येणार नाही, या साठी भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी हवेत असं सांगण्यात आलं आणी सगळा प्रयत्न वाया गेला .यानंतर शेतकऱ्यांकडून अमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला २४ तारखेला सुरू झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तहसिलदार शिल्पा ठोकडे यांनी २८ तारखेला स्वतः येवून रस्ता खुला करून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित केल्याचे वाघमारे यांनी सांगीतले.आंदोलन ठिकाणी पोलीसांकडून मोठा बंदोबस्त तैनात केला होता.या आंदोलास दत्त कला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा रामदास झोळ, बाजार समीतीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहूदादा फरतडे नेरलेचे माजी सरपंच औंदुबरराजे भोसले युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी समक्ष भेटून पांठिबा दिला होता.



■ आंदोलकांना लेखी आश्वासन देताना तहसिलदार शिल्पा ठोकडे

### २८ तारखेला अतिक्रमण रस्ता खुला करून देणार

महाशिवरात्रीदिवशी असलेल्या संगोबा येथील मोठ्याप्रमाणात साजरी होणाऱ्या यात्रेचे नियोजनामुळे पोलीस व महसूल प्रशासनवार ताण आहे त्यामुळे दोन दिवस सहकार्य करा २८ तारखेला स्वत: येऊन रस्ता खुला करून दिला जाईल – शिल्पा ठोकडे ( तहसिलदार)

### आश्वासन न पाळल्यास पुन्हा उपोषण करणार

तहसिलदार मॅडम यांनी दिलेल्या आश्वासनावर माझा व शेतकऱ्यांचा पुर्ण विश्वास आहे ते आपला शब्द पाळतील याची खात्री आहे पण दुर्दैवाने प्रशासनाने शब्द फिरवला तर पुन्हा याच ठिकाणी अमरण उपोषण सुरू ते रस्ता खुला होईपर्यंत संपणार नाही – राणा वाघमारे (युवा शेतकरी)

# संकट मोचन हनुमान देवस्थान गुंजखेडा येथील शिवालयात महाशिवरात्री पूजन अभिषेक संपन्न

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव: पुलगावपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या प्रसिद्ध संकट मोचन हनुमान देवस्थान, गुंजखेडा येथील शिवालयामध्ये महाशिवरात्रीच्या निमित्ताने भक्तिमय वातावरणात भगवान शिवाचे पूजन व अभिषेक संपन्न झाले.

ही पवित्र पूजा प्रसिद्ध पंडित सोनू महाराज तिवारी यांच्या शास्त्रोक्त मंत्रोच्चारासह विधीवत पार पडली. पूजनानंतर भगवान भोलेनाथाची महाआरती संपन्न झाली आणि 'हर हर महादेव', 'भोलेनाथ महादेव' च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या पूजन सोहळ्याला पुलगावचे ज्येष्ठ पत्रकार रवी केशरवानी आणि त्यांची पत्नी रेखा रवी केशरवानी, चेतन चौधरी व पायल चौधरी यांनी संपत्नीक उपस्थित राहून पूजा अर्चा केली. तसेच, मंदिर विश्वस्त गिरीश चौधरी, चंद्रप्रकाश तिवारी, किशोर चाणेकर, संजीव उर्फ पिंटू बतरा, गुड्डू तिवारी आणि रामचंद्रजी व्यास, सुनील ठाकूर आदी मान्यवरांनी पूजेमध्ये सहभाग घेतला. पूजन आणि अभिषेकानंतर मंदिरात आलेल्या सर्व दर्शनार्थी भाविक भक्तांना उपवास फलाहार प्रसादी वितरित करण्यात आली. यामध्ये साबुदाणा उसळ, साबुदाणा वडा, खवा जिलेबी, फराळी चिवडा आणि लस्सी यांचा समावेश होता.





महाशिवरात्री निमित्ताने संकट मोचन हनुमान देवस्थान, गुंजखेडा येथे शिवभक्तांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शनाचा लाभ घेतला. दिवसभर महादेवाच्या जयघोषात भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. या धार्मिक सोहळ्यामुळे पुलगाव आणि परिसरातील भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा आणि समाधानाचा अनुभव मिळाला.

# विद्यार्थ्यांची मागणी; अभ्यासिकेतील विद्युत फिटिंग त्वरित पूर्ण करा



**अल्लीपूर । प्रतिनिधी**

येथील अभ्यासिका विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे विद्युत फिटिंग त्वरित करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांनी प्रशासक तुषार जोगी आणि ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय दिवटे यांना निवेदन सादर करत विद्युत पुरवठा लवकरात लवकर सुरळीत करण्याची विनंती केली आहे.

ग्रामपंचायत सभागृहात रंगरंगोटी व सजावटीचे काम पूर्ण झाले असले तरी, गेल्या महिनाभरापासून विद्युत फिटिंग करण्यात आलेली नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी अभ्यास करताना विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. विजेअभावी अभ्यासिका निरुपयोगी ठरत असून, विद्यार्थ्यांना अंधारात बसून अभ्यास करावा लागत आहे. विद्यार्थ्यांनी प्रशासनाने तातडीने या समस्येची दखल घेऊन विद्युत पुरवठा सुरू करावा, जेणेकरून अभ्यास करताना कोणतीही अडचण येऊ नये, अशी मागणी केली आहे. ग्रामपंचायतने या विषयाकडे गांभीर्याने पाहून त्वरित उपाययोजना करावी, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे.

# हिंगणघाट मध्ये समशान घाट वना नदीच्या काठावर भाविक भक्तांचा महाकुंभ

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

आज दिनांक २७ फरवरी २०२५ महाशिवरात्री निमित्त समशानभूमी, वणा नदी काठावर, हिंगणघाट येथे दरवर्षी यात्रेच्या आयोजन केल्या जाते. याही वर्षी महादेवाच्या दर्शनासाठी लोकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती त्याचे अवचित साधून महामाई महाकाली पंचमुखी हनुमान मंदिर डंकीण, हिंगणघाट व स्व. आप्पाजी जोशी सेवान्यास हिंगणघाट, जिल्हा वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीची परंपरा राखत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांसाठी फराळ प्रसादाचे वितरण शिस्तबद्ध पणे करण्यात आले. याकरिता सर्व मंदिराचे भक्तगण तथा स्वर्गीय आप्पाजी जोशी सेवान्यास यांचे कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता या महाप्रसादाकरिता चार ते पाच हजार भाविकांनी याचा लाभ घेतला व कार्यकर्त्यांनी पुढल्या वर्षी याहीपेक्षा जास्त प्रमाणामध्ये महाप्रसाद आयोजित करण्यासाठी महादेवाला आशीर्वाद मागितला तसेच विविध प्रकारचे सेवा कार्य आमच्या कडून व्हावे असा आशीर्वाद रुपी प्रसादच मागणं महादेवाच्या चरणी मागण्यात आले. या प्रसादाच्या आयोजनाचे हिंगणघाट वासीयाकडून सर्व स्तरावर कौतुक करण्यात येत आहे.







# श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिरांत भक्तांची अलोट गर्दी

**मोखाडा । जितेंद्र मोरघा**

मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथे महाशिवरात्र निमित्ताने श्री घुटकेश्वर महादेव मंदिरांत पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शन घेतले.

येथील मंदिर समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महाशिवरात्री च्या निमित्ताने करण्यात आले होते. यावेळी मंदिर समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मंदिर बांधकामासाठी सहकार्य करणाऱ्या देणगी दारांना सन्मान पत्र शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. सकाळ पासून च विविध गांवामधुन पायी दिंड्या भजन किर्तनाचा जयघोष करीत श्री घुटकेश्वराच्या दर्शनासाठी येत होत्या. महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, स्वाध्याय परिवार कार्यक्रम ,ह.भ.प.रघुनाथ महाराज झोले यांचे किर्तन रात्री भजन असा संपूर्ण दिवस चा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या भाविकांचे आभार मंदिर समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मानले.



# पालघर जिल्ह्यातील तहसीलदारांना विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या नोंदी ठेवण्याचे आदेश द्यावे

## अनंता वनगा यांची मागणी

**पालघर । प्रतिनिधी**

जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या दुर्गम तालुक्यातील आदिवासी मजुर पालघर जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर होऊन मिळेल ते काम करण्यासाठी आपल्या कुटूबांसहित शहरी व शहरालगत असणाऱ्या भागात जाऊन काम करतात. त्यातच विटभट्टीवर जाऊन काम करणाऱ्या मजुरांची संख्या जास्त आहे. हे विटभट्टीवर काम करणारे मजूर आपल्या कुटुंबासह झोपड्या बांधून त्या ठिकाणी राहतात. परंतु विटभट्टी मालक त्याच्याकडे काम करणाऱ्या मजुरांची कुठलीही माहिती स्थानिक तहसीलदार कार्यालयात देत नाही. आई-वडिलांसोबत लहान मुलेही मजूर म्हणून काम करताना दिसत आहेत. एका-एका विटभट्टी मालकाकडे कमीत-कमी वीस ते पंचवीस मजूर तसेच त्यांची मुले काम करत असतात. मात्र प्रत्येक तालुक्यात किती विटभट्ट्या चालू आहेत व तिथे कुठल्या तालुक्यातील कुठल्या गावातील किती मजूर काम करत आहेत. हे स्थानिक तहसीलदार आज रोजी सांगू शकत नाही. त्यामुळे विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांवर अत्याचाराच्या तसेच महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या किंवा लहान मुलांचे लैंगिक शोषण होऊन मृत्यू झाल्यास अशा दबाव तंत्राचा वापर करून तिथेच दाबण्याचे प्रकार होतात. त्यामुळे अशे प्रकार रोखण्यासाठी वाडा तालुक्यातील आदिवासी मुक्ती मोर्चा या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले, तसेच वाडा तालुक्यातील लोहपे येथील विटभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासी महिलेवर अत्याचार झाला होता, तसेच पिडीत महिलेच्या मुलीचा त्याच वेळी ट्रॅक्टरच्या टायराखाली येवून मृत्यू झाला होता. या घटनेचा संदर्भ देऊन पालघर जिल्ह्यातील गावोगावी असणाऱ्या विटभट्टी मालकांकडे काम करणाऱ्या मजुरांच्या संपुर्ण कुटुंबाची नोंद ठेवणे शक्तीचे करावे व या माहितीच्या आधारावर या मजुरांच्या कुटुंबीयांना रेशन धान्यांची सुविधा आरोग्याची सुविधा महिला व बालकांना पोषण आहार, अंगणवाडी, बालवाडीची सुविधा पुरवता येईल. तसेच एखादी अन्याय, अत्याचाराची घटना घडल्यास त्यावर त्वरित निवारण करणे सोपे जाईल, त्यामुळे पालघर जिल्ह्यातील तहसीलदारांना विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या नोंदी ठेवण्याचे आदेश द्यावे अशी मागणी आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेच्या वतीने अध्यक्ष अनंता वनगा यांनी केली आहे.




# ट्रॅक्टरला बेकायदेशीर ट्रॉली 'बेफाम'! उसाची जीवघेणी वाहतूक; कारवाईची मागणी

## कारवाई होत नसल्याने नागरिक त्रस्त

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यात साखर कारखान्यांचा गळित हंगाम सुरू असल्याने अनेक भागात गाडीच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात ऊस भरून वाहतूक होतानाचे चित्र आहे. साखर कारखान्याकडे जाणाऱ्या सर्व मार्गांवर ट्रॅक्टरला अनधिकृतपणे दुसरी ट्रॉली लावून क्षमतेहून अधिक ऊस भरून सर्रास वाहतूक केली जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त व बेजबाबदारपणे ट्रॅक्टर- ट्रॉलीसह चालकांवर आरटीओने कारवाई करावी, अशी मागणी वाहनधारकांकडून होत आहे. जय हिंद साखर कारखाना व पंचगंगा साखर कारखाना असे दोन साखर कारखाने असले तरी तालुक्यातील ऊस छ.संभाजीनगर जिल्ह्यातील इतर तालुक्याबरोबरच मराठवाड्यातील काही साखर कारखाने ऊस घेऊन जातात. क्षमतेपेक्षा अधिक माल वाहतूक करताना रस्त्यात दोन वर्षात गंगापूर - वैजापूर रस्त्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर डबल ट्रॉलीमुळे अनेक जणांना वेगवेगळ्या अपघातात आपले प्राण गमवावे लागले तर ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टर- डबल ट्रॉलीने अपघताच्या अधिकच्या घटना वाढलेल्या आहे.




पोलिसांनी अवैध ऊस वाहतुकीला आळा घालण्यासाठी मोहीम राबवावी अशी मागणी होत आहे,परंतु यावर्षी सद्य:स्थितीत अवैध प्रकारची जीवघेणी ऊस वाहतूक सर्रास सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.रस्त्यावर ऊस वाहून नेणाऱ्या विनारिफ्लेक्टर ट्रैक्टरांची वर्दळ वाढली आहे. सदोष पद्धतीने सुरू असणारी ऊस वाहतूक रस्त्यावरून धावणाऱ्या अन्य वाहनचालकांच्या जिवावर उठली आहे. यामुळे छोट्या- मोठ्या अपघातांची शक्यता असल्याने आरटीओ व पोलिसांनी संयुक्त रित्या कारवाई करावी अशी वाहनधारकांची मागणी आहे. क्षमतेपेक्षा अधिक उसाचा भरणा उसाच्या वाहतुकीनुसार ट्रॅक्टर मालकाला कारखान्याकडून भाडे अदा करण्यात येते. यामुळे ट्रॅक्टरचालक क्षमतेपेक्षा अधिक ऊस ट्रॉलीत भरतात. यासाठी सर्रास दोन ट्रॉलींचा वापर करण्यात येतो. एका ट्रॉलीची क्षमता १४-१५ टन इतकी असते. परंतु, यामध्ये १८-२० टन ऊस भरला जातो. नफा कमाविण्यासाठीचा हा प्रकार इतरांसाठी जीवघेणा ठरत आहेत. ऊस वाहतुकीसाठी विनापासिंग ट्रॉलीचा वापर करण्यात येतो. ऊस वाहतूक करणार्या ट्रॅक्टरांच्या अपघातास प्रामुख्याने ट्रॉली कारणीभूत ठरतात. ट्रॅक्टरला स्वतंत्रपणे ट्रॉली जोडण्यात येते. यामुळे त्यांना इंडिकेटर नसतो. त्याचबरोबर रिफ्लेक्टरदेखील वापरण्यात येत नाही. केवळ एका लाइटच्या जोरावर चालक बेफामपणे ट्रॅक्टर दामटत असतात. त्यातून अपघात घडून अनेकांचे बळी जातात. ट्रॅक्टर चालकांवर कोणाचाही वचक नसल्याने बेफिकीर व बेकायदेशीर ऊस वाहतूक केली जात आहे. त्याचबरोबर ट्रॅक्टर मालकाकडून कमी कालावधीत अधिक नफा मिळवून देणारा व्यवसाय म्हणून ऊस वाहतुकीला प्राधान्य देण्यात येते.

# विद्युत यंत्रणेच्या क्षमता संवर्धनाची कामे तात्काळ मार्गी लावावीत-राधाकृष्ण विखे पाटील

**शहाजी दिघे । अहिल्यानगर**

जिल्ह्यातील विद्युत यंत्रणेच्या क्षमता संवर्धनाची कामे प्राधान्याने मार्गी लावावी, यासाठी सर्व जुन्या उपकेंद्रांचे आणि वाहिन्यांचे सविस्तर सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार बदल करण्याचे आदेश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या महावितरण कामकाज आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे, महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, महापारेषणचे अधीक्षक अभियंता एस.बी. भोळे, महावितरणचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार, विनायक देशमुख आदी उपस्थित होते.



मंत्री विखे पाटील म्हणाले, लवकरच राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यात जिल्ह्यातील महावितरण कंपनीचे प्रलंबित प्रस्ताव समाविष्ट व्हावेत, यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा. ग्रामीण भागात विद्युत पुरवठा अनियमित असल्याच्या तक्रारी वारंवार येतात. सध्याची उपकेंद्रे सक्षम करणे आणि नव्या उपकेंद्रांची कामे मार्गी लावल्यास विजेच्या समस्या दूर होतील. विद्युत यंत्रणेची क्षमता वाढवण्यासाठी कालमर्यादा निश्चित करून कामे वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. गतवर्षी जिल्ह्याला विद्युत रोहित्रासाठी सर्वाधिक निधी देण्यात आला होता. त्याचा नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी उपयोग करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. ऑनलाइन यंत्रणेचा अधिकाधिक वापर करून विद्युत देयकांच्या तक्रारी वेळेत निकाली काढाव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच, घराचा आकार व वीज वापर यानुसारच देयके आकारण्याचे निर्देश त्यांनी दिले. अहिल्यानगर, शिर्डी आणि संगमनेरमधील दाट वस्ती, शाळा आणि बाजारपेठांमध्ये भूमिगत वाहिन्यांसाठी निधी मिळवण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून केला जाईल, असेही पालकमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची माहिती नागरिकांना योग्य माध्यमातून देण्यात यावी, तसेच प्रधानमंत्री कुसुम-बी कृषी पंप योजनेसाठी सर्वाधिक अर्ज जिल्ह्यातून आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत २३५६ मेगावॉट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले असून त्यासाठी ११७८६ एकर जमीन आवश्यक आहे. त्यापैकी ३३९२ एकर क्षेत्र मंजूर झाले असून त्याद्वारे ५०८ मेगावॉट वीज निर्मिती शक्य आहे. सौर ऊर्जा उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही पालकमंत्री विखे पाटील यांनी दिल्या. बैठकीत महापारेषण आणि महावितरणशी संबंधित विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नृत्य अविष्कारातून जिंकली मने

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साही व आनंदमय वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांनी आपल्या बहारदार नृत्यअविष्कारातून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरजचंद्र पवार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून जेऊर गावचे कार्यक्षम सरपंच पृथ्वीराज पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य जयप्रकाश बिले होते.

प्राचार्य जयप्रकाश बिले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सुरज देशमुख यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले तसेच पृथ्वीराज पाटील यांच्या जेऊर गावच्या विकासातील योगदानाची प्रशंसा केली. कार्यक्रमाला बेली उद्योग समूहाचे हरिदास डांगे, निवृत्त पोलीस अधिकारी मा. गोडगे,



झरेचे उद्योजक नारायण शेठ अमृळे, सरपंच बंडू घाडगे, माजी सरपंच प्रशांत पाटील, प्रा. राजेश शिंदे, भीमराव घाडगे, रूपाली माने, दाक्षायणी पवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, कांतारा, राधाकृष्ण, शंकर तांडव, विठ्ठल गोरा कुंभार, राम हनुमान, शिवकन्या, छावा, फनी डान्स, रीमिक्स डान्स आणि लावणी अशा विविध गीतांवर सुंदर नृत्याविष्कार सादर केला. पालकांनी विद्यार्थ्यांच्या बहुमुखी कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या संचालिका डॉ. स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, सचिव युवराज बिले, बीसीए कॉलेजचे प्रमुख किरण परदेशी सर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नंदकुमार वलटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सतीश कोंडलकर यांनी केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे अविस्मरणीय ठरला.

## महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाच्या वतीने राज्यस्तरीय १२ वी ऊस परिषदेचे आयोजन

**कोपरगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघ व मासिक ऊस संदेश यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय १२ वी ऊस परिषद शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जनाई गार्डन, शिराळ रोड, पेठ, ता. वाळवा, जि. सांगली येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती परिषदेचे संयोजक समिती अध्यक्ष युवराज पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सध्या ऊस शेतीसमोरील विविध समस्या वाढत असल्याने शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी शेतकरी, विचारवंत आणि उद्योजकांनी एकत्र येऊन मार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. परिषदेचे उद्घाटन शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी केळी उत्पादक संघाचे संस्थापक अध्यक्ष किरणभाऊ चव्हाण



असतील. मुख्य मार्गदर्शन महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाचे संस्थापक अध्यक्ष अतुलनाना माने पाटील करणार आहेत.

**परिषदेच्या वेगवेगळ्या सत्रांमध्ये खालील विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे :**

'उद्दीष्ट एकरी १०० टनाचे' – सुरेश उबाळे (ऊस पैदासकार, पाडेगाव ऊस संशोधन केंद्र) 'ऊस पीक पाणी व्यवस्थापन' – शामकांत पाटील (महाराष्ट्र प्रमुख, जैन इरिगेशन लि.) 'खत व्यवस्थापन' – महेंद्र घाटगे (राज्य तज्ञ संचालक, ऊस संघ)'ऊस विकास योजना राबवणे आजची गरज' – अनंत निकम (माजी कार्यकारी संचालक, साखर कारखाना)

**प्रमुख उपस्थिती :** विवेक कुंभार (जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी, सांगली) नामदेव परीट (जिल्हा कृषी उपसंचालक, कोल्हापूर) संजय बुवा (कृषी अधिकारी, पंचायत समिती, वाळवा) सचिन पाटील (राज्य उपाध्यक्ष, ऊस संघ) अशिष पाटील (राज्य संचालक, ऊस संघ) सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या ऊस परिषदेत सहभागी होऊन ऊस शेतीसंबंधी महत्त्वपूर्ण मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष अतुलनाना माने पाटील यांनी केले. यावेळी पत्रकार परिषदेसाठी समीर शेख, युवराज पाटील, अमर पाटील, महेंद्र घाटगे, विकास पाटील आदी उपस्थित होते.

## भाजपला खिंडीत गाठण्याची रणनीती ठरली!

## थोरातांकडून 'हर हर महादेव'ची घोषणा

**संगमनेर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीनंतर विखुरलेली काँग्रेस नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात पुन्हा सावरू लागली आहे. राज्य पातळीवरील बैठक पार पडल्यानंतर आता जिल्हा पातळीवरही कार्यकर्त्यांच्या बैठका पार पडत आहेत. ज्येष्ठ नेते आढावा घेत आहेत. बुधवारी (२६ फेब्रुवारी) माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात अहिल्यानगर जिल्ह्याची बैठक पार पडली. यावेळी त्यांनी विधान सभा निवडणुकीतील पराभव विसरून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष केंद्रीत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नुकतीच जिल्हाध्यक्षांची बैठक मुंबईत घेतली. त्यानंतर ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी अहिल्यानगरमधील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी पदाधिकाऱ्यांसाठी खास जेवणाची सोय करण्यात आली होती. देशाती सर्वांना समानता अन् अधिकार देणारी लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेस पुन्हा मैदानात उतरल्याचे सांगून कार्यकर्त्यांमध्ये बळ भरण्यासाठी 'हर हर महादेव'ची घोषणा दिली. थोरातांची ही घोषणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेससाठी 'टर्निंग पाईंट' ठरणार का? याची आता उत्सुकता आहे. बाळासाहेब थोरात म्हणाले, काँग्रेसचा विचार हा सर्वसामान्यांचा,



सर्वधर्मसमभावचा विचार आहे. देशातील सर्वांना समानता व अधिकार देणारी लोकशाही वाचवायची आहे. यासाठी काँग्रेस पुन्हा मैदानात उतरली आहे. हार-जीत सुरू राहते पण आता'हर हर महादेव', म्हणत प्रत्येकाने लोकशाही वाचवण्यासाठी पुढे यावे. काँग्रेसची विचारधारेवर यापूर्वीही अनेकदा प्रहार झाले आहेत. पण विचारांची, त्यागाची आणि बलिदानाची परंपरा फक्त काँग्रेसकडेच आहे.लोकसभा निवडणुकीतील विजयानतर फक्त चार महिन्यात विधानसभा निवडणुकीत एवढा कसा बदल होऊ शकतो, हा मोठा प्रश्नच आहे. ईव्हीएम'बाबत अनेकांना शंका आहे. निवडणूक आयोगाकडून अजून समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. सत्ताधाऱ्यांनी टोकाचा धर्माचा प्रचार केला. सोशल मीडियाचा चुकीचा वापर करत त्यातून त्यांनी यश मिळवले. हे जरी सत्य असले, तरी आम्ही, काँग्रेस जनतेच्या प्रश्नावर पुन्हा मैदानात उतरलो आहोत', असे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले.

## विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांचा स्नेहबंधतर्फे गौरव

**अहिल्यानगर । शहाजी दिघे**

गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांचा स्नेहबंध संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी गौरव केला.राष्ट्रपती पदक स्वीकारल्यानंतर कराळे हे नगर जिल्हा दौऱ्यावर आले होते. या निमित्ताने सन्मानपत्र व तुळशीचे रोप देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी सांगली महापालिका शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतले. सातारा सैनिक स्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून रसायनशास्त्रात बीएस्सी पदवी मिळवली. चंद्रपूरमधील नक्षलग्रस्त भागात पोलीस उपअधीक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. युनोमध्ये युगोस्लाव्हिया आणि कोसोवा येथे आंतरराष्ट्रीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी सेवा दिली. मुंबई, नाशिक, कल्याण, ठाणे,



धाराशिव येथे पोलीस उपायुक्त तसेच पोलीस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, दहशतवाद विरोधी पथक, तसेच पोलीस महासंचालक कार्यालयात त्यांनी उल्लेखनीय सेवा दिली आहे. २०१३ मध्ये त्यांना राष्ट्रपती पदकाने गौरविण्यात आले होते. तसेच त्यांना युनो शांती सेवा पदक, आंतरराष्ट्रीय सेवा पदक, विशेष सेवा पदक आणि पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह प्राप्त झाले आहे.कार्यक्रमाचे आयोजन स्नेहबंध संस्थेच्या वतीने करण्यात आले होते.

## महाशिवरात्री निमित्त भगवान विश्वनाथच्या पालखी सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद



**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड तालुक्यातील इसाद येथील भगवान विश्वनाथ देवस्थानच्या पालखी सोहळ्याला पारंपरिक उत्साहात सुरुवात झाली. शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने हजेरी लावली. मासोळी नदीच्या तीरावर वसलेले हे सुंदर व ऐतिहासिक मंदिर महाशिवरात्रीच्या निमित्ताने भाविक भक्तांनी फुलून गेले. भगवान विश्वनाथाच्या पालखी सोहळ्यासाठी गावातील मुख्य रस्त्यावर भक्तिरसात न्हालेल्या टाळकरी आणि वारकरी मंडळींनी भजन-कीर्तनाचा जल्लोष निर्माण केला. पालखी मंदिरातून निघून संपूर्ण गावाची नगरप्रदक्षिणा करत मानकऱ्यांच्या खांद्यावर विराजमान झाली. टाळ-मृदंगाच्या गजरात हा सोहळा संपन्न झाला. परभणी जिल्ह्यातील भाविक भक्तांमध्ये या विश्वनाथ देवस्थानचा मोठा महिमा असून, 'काशी विश्वनाथाचं दुसरं रूप' म्हणूनही इसादच्या विश्वनाथाची ओळख आहे. या पवित्र सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भक्तगण दाखल झाले होते, तसेच मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## संगोबा देवस्थान ची यात्रा प्रचंड गर्दी भाविकांची दर्शनासाठी तीन तासांची वेटिंग



**सोलापूर । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे याही वर्षी संगोबा देवस्थानच्या यात्रेला भरपुर गर्दी झाली होती .त्यामुळे यात्रा कमेटीवर भरपूर ताण आलेला पहावयास मिळाला .यात्रा कमिटीच्या अध्यक्षा तहसीलदार सौ शिल्पाताई ठोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा महोत्सव पार पडत आहे .

मंदिर परिसरात उन्हाचा त्रास भाविकांना बसत होता हे आवर्जून दिसून येत होते .मंदिरात दर्शन रांग लांब असल्याने किमान दोन ते तीन तास तरी दर्शनासाठी लागत होते .वरती उन व खाली दगडी ब्लॉक असल्याने पायाची लाही लाही झाल्याचे ,लहान मुले रांगेत उभे राहून हा त्रास सहन करत होते .भाविकांचा हा त्रास सरपंच अंकुश शिंदे ,ग्रामविकास अधिकारी हरिभाऊ दरवडे ,देवस्थान ट्रस्ट चे सचिव प्रा राजेश गायकवाड यांच्या लक्षात आल्यावर हा त्रास कमी करण्यासाठी योग्य असा पर्याय म्हणून उपाय योजना राबविण्यात येणार आहे असे सरपंच शिंदे व दरवडे यांनी सांगितले आहे .पोलिस निरीक्षक विनोदकुमार घुगे यांनी चोख बंदोबस्त ठेऊन यात्रेला सहकार्य केले आहे .लाखोंच्या संख्येने सहभागी झालेले भाविकांची गर्दी पहाता यावर्षी गर्दी जास्त प्रमाणात दिसून येत होती .राज्य परिवन मंडळ करमाळा आगार यांनी भरपूर प्रमाणात एसटी बसेस उपलब्ध करून दिल्यामुळे गर्दी चे प्रमाण कमी करण्यासाठी मदत झाली आहे .

## पोकसो अंतर्गत कायद्यान्वये शिक्षका विरुदध गुन्हा दाखल



**सातारा । किरण अडागळे**

एका अल्पवयीन विद्यार्थिनीशी अश्लील चाळे केल्याबद्दल सातारा तालुका पोलीस ठाण्यात पोकसो अंतर्गत कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना दिनांक १६ फेब्रुवारी रोजी घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. शिक्षकाने अश्लील चाळे केल्यानंतर सदर मुलगी घाबरली. मुलगी काही दिवसांपासून बोलत नव्हती व घाबरली होती परंतु मुलीला तिच्या कुटुंबीयांनी बोलते केले असता शिक्षकाने केलेल्या अश्लील चाळया बदल माहिती दिली.व त्या नुसार कुटुंबातील सदस्यांनी तात्काळ सातारा तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी शिक्षकांवर पोकसो अंतर्गत कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.


सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .